‘मेट्रन’ पदावर दि.०१/०१/२०१६ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची दि.१/१/२०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक सेवाजेष्ठतासूची प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८
क्र.प्रशा/१२/कावि/ २३४ /२०१९
दिनांक २८ / ०२ /२०१९

वाचले क्र.१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११
२) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/ ११७५/२०१३ दि. २९/८/२०१३
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/ ६५/१२ दि. १९/१/२०१२
४) प्रशासन विभागाकडील दि. २६ / ०२ /२०१९ चा मान्य प्रस्ताव

आदेश

**‘मेट्रन’** पदावर दि.०१/०१/२०१६ रोजी काम करणाऱ्या ०१ अधिकाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासूची आदेश क्र.प्रशा/१२/कावि/४९६/२०१६ दि.३१/०५/२०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **‘मेट्रन’** पदावर दि.०१/०१/२०१६ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या ०१ अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक सेवाजेष्ठतासुची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार ---

१) तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुचीमधील नमुद अधिकाऱ्यांनी स्वतःचे नावाबाबत, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा जेष्ठतासुचीमध्ये नांव नसलेबाबत काही आक्षेप असल्यास त्याबाबत आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची प्रसिध्द झाल्यापासुन **१५ दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांच्या शिफारसीसह प्रशासन विभागात योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.
२) आक्षेपासंदर्भातील योग्य ते पुरावे सत्यप्रती करुन सादर न केल्यास आक्षेप फेटाळण्यात येतील. निश्चित केलेल्या १५ दिवसांचे मुदतीत आक्षेप प्रशासन विभागात प्राप्त न झालेस सदरचे आक्षेप फेटाळण्यात येतील तसेच दप्तरी दाखल केले जातील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.
३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत **स्वाक्षांकित पोहोच ८ दिवसाचे** आत प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर जेष्ठतासुची त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.
४) संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असलेस सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत प्रशासन विभागाकडे सादर करावे.
५) तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची प्राप्तच झाली नाही, किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उक्त संदर्भ क्र.३ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.
६) तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४००३२ दि.२१/१०/२०११ मधील सुचनांनुसार तयार केली आहे.
७) तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज / याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासुची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

प्रशासन अधिकारी, (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

मेट्रन पदावर दि.01/01/2016 ते दि.31/12/2018 या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची दि.01/01/2019 रोजीची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक सेवाजेष्ठतासुची

**वेतनश्रेणी :- 9,300-0-34,800 ग्रेड वेतन :- 4,600**

| अ.क्र. | संगणक क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | मेट्रन रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्त दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 4324 | चव्हाण मोनिका ज्ञानेश्वर | विमुक्त जाती (अ) | बी.पी.एन.ए. | 06/08/1963 | 29/11/2016 | पदोन्नती | स्टाफ नर्स | 15/04/1985 | 31/08/2021 | |

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

सही/-
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018